Research Papers

आदिवासींच्या जात पंचायती व सहभाग

प्रा.डॉ. संजय बी. गोरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शरदराव पवार कला व वाणिज्य
महाविद्यालय, गडचांदूर, जि.चंद्रपूर
पिन कोड – 442 908

Abstract

आदिवासींचे स्वतंत्र अस्तित्व असताना देखील ती आपल्या पिढ्यानपिढ्या पासून चालत आलेल्या रूढीपरंपरानुसार जीवन जगतो आहे. आदिवासींची जीवन पद्धती अगदी वेगळी असून त्याची ओळखही वेगळी आहे. आदिवासींचा निसर्गधर्म हा त्यांच्या वेगळ्या ओळखीची नांदी मानली जाते. आधुनिक संस्कृती निसर्गाची मारक असली तर आदिवासी तर आदिवासी मात्र निसर्गाचे पूजक आहे. आदिवासींचा निसर्गधर्म स्वदेशीय असून त्यांच्या न्यायनिवाडा करणाऱ्या गणपंचायती, जात पंचायती आज तेवढ्यात ताकदीने उभ्या आहेत.

अनेक पिढ्यांपासून चालत आलेली आदिवासींची रूढी, परंपरा, चालीरिती, भाशा, धर्म न्यायनिवाडा करणाऱ्या पंचायत अस्तित्वात असताना सुध्दा आदिवासींचा वेगळा कायदा बनविण्यात आला नाही किंवा त्यांच्या अनादिकाळापासून चालत आलेल्या रूढी परंपरांना कायद्यात्मक मान्यता देण्याबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्षित करण्यात आले आहे. पर्यायाने स्वतंत्र भारत देशातील आदिवासींना कायद्यापासून दूर करण्यात आले आहे. मात्र सद्यस्थितीत आदिवासींच्या विकासार्थ अनेक योजना व अधिकार विविध तरतूदींच्या माध्यमातून शासन देत आहे.

प्रस्तावना :

भारतीय घटनेच्या पाचव्या व सहाव्या अनुसूचिद्वारा निर्माण करण्यात आलेल्या आदिवासींना अनुसूचित क्षेत्रांना बहाल केलेल्या अधिकारानुसार स्वतःचे नियम कायदे बदलविता येतात. स्वातंत्र्य प्रदेशातील आदिवासींना गणपंचायतीत न्यायनिवाडा करण्याचे अधिकार मिळाले असतीलही, मात्र या गणपंचायती राज्य घटनेच्या मूळ तत्वाला छेदून वेगळे कायदे बनवू शकत नाही. जगात भारत आदिवासी लोकसंख्या सर्वात मोठा देश असून या देशातील आदिवासींना मान्य देण्यासाठी स्वतंत्र कायदे नाही. याउलट इतर कायद्यांच्या तुलनेत आदिवासींचे परंपरागत कायदे समतेवर आधारित असल्याचे दिसून येते. आदिवासी समाजामध्ये स्त्री–पुरूशांचा दर्जा समान मालना जातो. 'गोटूल' मध्ये तरूण–तरूणींना आपला जीवनसाधी

|| 2 ||

निवडण्याचे स्वातंत्र असते. हुंडा पद्धती किंवा सती प्रथा सारख्या कुप्रथा आदिवासींमध्ये नाही. यावरून नियमन करणारी पंचायत ही संस्था आदिवासींच्या सामाजिक जीवनाचे महत्वाचे अंग मानले जाते.

आदिवासींच्या गणपंचायतीने नियम अलिखीत असून पिढ्यानपिढ्या चालत आलेले आहेत. ते आजही आदिवासी समाजावर बंधनकारक आहे. आदिवासींची गणपंचायत, जातपंचायत ही त्यांच्या जमातीत न्यायाची सर्वोच्च संस्था मानली जाते. चंद्रपूर जिल्ह्यात गोंड, परधान, कोलाम, हलबी, पारधी, राजगोंड, ठाकूर इत्यादी जमाती अस्तित्वात असून या सर्व जमातीत जात पंचायत अस्तित्वात होत्या. पाडे, वस्ती, गणे जोपर्यंत या जमातीत अस्तित्वात होत्या तो पर्यंत जाती पंचायतीचे महत्व अबाधित होते. पंचायतीचे कार्यक्षेत्र मर्यादित स्वरूपाचे असल्याने त्या–त्या भागत त्यांचा चांगला प्रभाव होता. आजही जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील पिट्टीगुडा, सालेगुडा इत्यादी आदिवासींचे अस्तित्व असणाऱ्या गुड्यांवर या पंचायतीचे अस्तित्व अल्प प्रमाणत कां होईना सार्वजनिक निर्णयांच्या संदर्भात बघावयास मिळते. चंद्रपूर जिल्ह्यात गोंडाचे प्राबल्य दिसून येते. त्यांच्यातील ग्रामाची रचना असे व जात पंचायत महत्वपूर्ण मानले जात असे. या जमातीची स्वतंत्र अशी न्यायव्यवस्था आहे. या जमातीमध्ये अद्यापही पंचायतीचे महत्व कमी झालेले दिसून येत नाही. पंचायतीचे गोंड लोकांच्या दैनंदिन

जीवनाचे नियंत्रण करतात. पंचायती समोर खटले चालतात, पंचायती गुन्हेगारांना आर्थिक दंड, बहिश्कार टाकणे, सामूहिक भोजन देणे या शिक्षा दिल्या जातात. चंद्रपूर जिल्ह्याच्या गॅझेटमध्ये जिल्ह्यातील गोंडाच्या जात पंचायतीचा उल्लेख आढळतो.

शोधनिबंधाची उद्दिष्टे :

1) आदिवासींमधील जात पंचायती संकल्पना स्पश्ट करणे.

2) आदिवासींच्या परंपरागत जीवन पद्धतीची ओळख करून देणे.

3) आदिवासींच्या परंपरागत रूढी, प्रथांना कायद्याची मान्यता देण्यासंबंधी उपाययोजना सुचविणे.

4) आदिवासींच्या जीवनाचे नियमन करणारी जात पंचायत ही संस्था आदिवासींच्या सामाजिक जीवनाचे अंग आहे हे स्पश्ट करणे.

||3 ||

६० वर्षानंतरही आदिवासी जात पंचायतीचे अस्तित्व कायम :

कोलामाच्या प्रत्येक वस्तीत पंचायत किंवा पंच मंडळ असते. भांडण तंटे पंचायतीने दिलेल्या न्यायनिवाड्याानुसार सोडविले जातात. कोलामांच्या शासकीय कोर्ट कचेऱ्या पेक्षा पंचायत व्यवस्थेवर अधिक विश्वास आहे. पंचायतीच्या अध्यक्ष किंवा प्रमुखास 'नाईक' असे म्हटले जाते. उपाध्यक्षास 'महाजन' म्हणतात, तर 'कारभारी' संयोजकाचे कार्य करतो, तर पंचायतींच्या सभेची सुचना देण्याचे कार्य 'घट्याा' ला करावे लागते. 'नारमा' हा कोतवालाचे काम करतो. दरवर्शी चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी मागील वर्शात पंचायतीने केलेल्या कामाचा आढावा घेतला जातो. पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांच्या कार्याचे मूल्यमापन केले जाते व आपल्या कर्तव्यात कमी पडणाऱ्या पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांना बदलविले जाते. नवीन सदस्य बहुमताने घेतले जातात. अशा प्रकारे पंचायत व्यवस्थेच्या परंपरेचे कोलामांनी आजच्या काळातही जतन केले असल्याचे दिसून येते. विदर्भातील कोलाम जातीच्या अभ्यासावरून प्रा. भाऊ मांडवकरांनी काढलेले निश्कर्श महत्वपूर्ण मानला जातो. त्यांच्या मते कोलामाची पंचायत स्वतंत्र, निर्भिड आणि न्याय निश्ठूर असून ती परंपरेने चालू आहे. तिचे स्वतंत्र नियम आहे ते अलिखीत असले तरी परंपरागत आहे. परंपरेमुळे या व्यवस्थेकडे कोलाम जमात आदराने पाहते, आजचे जीवन गुंतागुंतीचे होऊनही व आपुनिकरणाचा आदिवासींवर प्रभाव पडला असला तरी कोलाम लोकांच्या आपसातील तक्रारी न्यायालयात जात नाही हे महत्वाचे आहे. इतर आदिवासी जमातींच्या लोकांची आपआपल्या पंचायतीकडे आदराची पाहण्याच्या भूमिकांमुळे जात पंचायतीचे अस्तित्व आजही टिकून आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासींच्या जनजीवनाच्या अभ्यासात असे आढळून येते की, या जमातीवर गोंडाच्या ऐतिहासिक राज्याच्या संस्कृतीचा प्रभाव त्यांच्या पंचायतीवर पडला असल्याचे दिसते. एकंदरीत अनादिकाळापासून आदिवासींच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक व्यवस्थेने नियंत्रण करणारी व्यवस्था पंचायतीच रूपाने कां होईना अस्तित्वात होती हे लक्षात येते. रूढी, परंपरा यांचे सामुदायिक जतन करणाऱ्या या समाजाने आपले अस्तित्व कायम ठेले असून समाजात असणाऱ्या त्यांच्या परंपरा, पंचायती, गणपंचायत, पोडे, गुडे इ. घटक व प्रक्रिया जपून ठेवल्या आहेत. जिल्ह्यातील गोंड, परधान, कोलाम, हलबा इ. समुदायांच्या राजसत्ता अस्तित्वात असल्याचे पुरावे मिळतात. चंद्रपूर जिल्ह्यात किल्ले, मंदिरे, शिलालेख इ. स्वरूपात त्यांच्या अस्तित्वाचे जतन केलेले दिसून येते. आदिवासींच्या तत्कालीन व्यवस्थेत त्यांच्या जात पंचायतीची व्यवस्था राजकीय स्वरूपाची निश्चित असेल. परंपरांगत

||4 ||

कायदा व नियम पालनावर विश्वास ठेवणारी आदिवासी जमात पंचायतीच्या व्यवस्थेत नक्कीच एकरूप होती हे दिसून येते. चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी समुदायांमध्ये हळूहळू जात पंचायतीचा प्रभाव कमी होत असल्याचे दिसून येते. आधुनिकीकरण, नागरिकीकरण, आदिवासींचा शहराशी आलेला संबंध, आदिवासींच्या विकासार्थ शासनाच्या योजना, पंचायत राज्य संस्थामार्फत आदिवासींना मिळालेले राजकीय हक्क, त्यांच्यात होत असलेली राजकीय व सामाजिक परिवर्तने यामुळे जिल्ह्यातील गोंड, परधान, कोलाम ठाकूर, हलबा, हलबी इ. आदिवासी जमातीत जात पंचायत प्रभावहीन झाल्याचे दिसून येते.

उपाययोजना :

1) आदिवासींना न्याय देण्यासाठी स्वतंत्र कायदे निर्माण करण्यात यावे.

2) आदिवासींच्या न्यायनिवाडा करणाऱ्या जात पंचायतींना वैज्ञानिक मान्यता देणे आवश्यक आहे.

3) आदिवासींच्या पंचायतीमध्ये सुशिक्षित आदिवासींना समाविश्ट करून एक सक्षम न्यायव्यवस्था उभी करावी.

4) आदिवासींसाठी न्यायनिवाडा करणाऱ्या स्वतंत्र्य न्यायव्यवस्था निर्माण करण्यात याव्यात.

5) आदिवासींचा शासकीय न्यायव्यवस्थेपेक्षा जात पंचायतीतील न्याय व्यवस्थेवर विश्वास आहे. त्यामुळे त्यांच्या संस्कृतीच्या अध्ययनातून न्यायव्यवस्था निर्माण व्हावी.

6) आदिवासींची रूढी, परंपरा चालीरिती, धर्म न्यायनिवाडा करणाऱ्या पंचायतींचे जतन करून पारंपारीक रितीने न्यायदान व्यवस्था निर्माण व्हावी.

7) अस्तित्वात असणाऱ्या जात पंचायतींना सक्षम करून आदिवासींचे सुशिक्षित नेतृत्व उभे करता येऊ शकते.

निष्कर्ष :

आदिवासींच्या गणपंचायतीचे नियम अलिखीत असून पिढ्याानपिढ्याा चालत आलेले आहेत व ते आजही आदिवासीं समाजावर बंधनकारक आहे. आदिवासींची गणपंचायत, जातपंचायत ही त्यांच्या जमातीत न्यायाची सर्वोच्च संस्था मानली जाते. आदिवासींची परंपरागत जीवन जगण्याची पद्धती व रूढी परंपरेला दैवत मानणाऱ्या भूमिकांमध्ये आजही अनेक जमातीत न्यायनिवाडा करणारी पंचायत संस्था अस्तित्वात आहे.

||5 ||

विशेशतः महाराश्ट्राच्या अनेक आदिवासी जिल्ह्यात गोंडाचे प्राबल्य दिसून येते, त्यांच्यातही ग्रामाची रचना व जात पंचायत संस्था महत्वाची मानली जाते. यावरून आदिवासींच्या जीवन पद्धतीत पूरातन प्रथांचे किती महत्व खोलवर आहे हे लक्षात येते. आदिवासींच्या जीवनमानाचे सुत्र पारंपारीक रूढी, परंपरांशी बांधिल असल्याचे आढळून येते. न्यायनिवाडा आणि समाधान या बाबी परंपरागत जात पंचायतींच्या निर्णयाशी असणे ही बाब या ठिकाणी महत्वाची ठरते.

आदिवासींच्या जात पंचायती विशेशतः आर्थिक, सामाजिक दृश्टीने महत्वाच्या होत्या. कारण या पंचायतींच्या प्रक्रियेत सामाजिक समतेला महत्व होते ही बाब पारंपारीक जीवन जगणाऱ्या आदिवासींच्या एकरूप व प्रामाणिक जीवनमानाचा परिचय देण्यात पुरेशी वाटते. आदिवासींच्या जात पंचायती त्यांच्या दैनंदिन जीवनमानाचे नियंत्रण करणाऱ्या होत्या. यावरून आदिवासी समाज आपली संस्कृतीचे रक्षण करून आपला विकास करण्याच्या दृश्टीने प्रयत्नशील होता हे आढळून येते.

आदिवासींच्या जात पंचायतीद्वारे घेतलेल्या निर्णयाची काटेकोरपणे अमलबजावणी होत असे तसेच पंचायतीद्वारे देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या शिक्षा, दंड यांचे पालन केले जाते असे यावरून न्यायाची प्रतिश्ठा टिकविण्याची मानसिकता व समाजाचे रक्षण करण्याची विचार प्रवृत्ती आदिवासींमध्ये असल्याचे आढळून

येते.

महाराश्ट्रातील अनेक आदिवासीबहूल जिल्ह्यात विशेशतः चंद्रपूर जिल्ह्यात गोंड, परधान, कोलाम, हलबा, पारधी, राजगोंड, ठाकूर इ. जमाती अस्तित्वात असून या सर्व जमातीत जात पंचायती अस्तित्वात होत्या. पंचायतीचे कार्यक्षेत्र मर्यादित असल्यामुळे त्यांचा त्या–त्या भागात प्रभाव चांगला दिसून येतो.

महाराश्ट्राच्या अनेक जिल्ह्यातील आदिवासी वस्ती, गुडे या भागात ज्या ठिकाणी आदिवासींची जमात एकत्रितपणे निवास करते. त्या भागात आजही जात पंचायतीचे अस्तित्व अल्प प्रमाणात कां होईना सार्वजनिक निर्णयाच्या संदर्भात बघावयास मिळते. मात्र नागरीकरण, आधुनिकीकरण, शासनव्यवस्था, विविध कायदे आणि पंचायत राज संस्थांच्या भूमिकांमुळे आदिवासींमधील जात पंचायतींचे अस्तित्व प्रभावी असल्याचे आढळून येत नाही.

||6 ||

संदर्भग्रंथ सूची :

1)सगवे, डॉ. विलास : आदिवासींचे सामाजिक जीवन पॉपुलर प्रकाशन, मुंबई, द्वि.आ. 1978

2)गारे, डॉ. गोविंद : महाराश्ट्रातील आदिवासी जमाती कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, द्वि.आ. 2002

3)देवगावकर, डॉ. शैलता : आदिवासी विश्व देवगावकर, डॉ. श.गो आनंद प्रकाशन, नागपूर, प्र.आ. जुलै 2001

4)नाडगोंडे, डॉ. गुरूनाथ :भारतीय आदिवासी कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्र.आ. 1986

5)कुलकर्णी, प्रा. वि.श्री.: भारतातील आदिवासी वंश प्र.महाराश्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

6)थापर, रोमिला : भारत का इतिहास राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, तृ.आ. 1999

7)सोमवंशी, प्रा. अनिल राजकीय मानवशास्त्र बेके प्रकाशन, गांधी नगर, अमरावती प्र.आ. 1 सप्टें. 2001

8) गारे, डॉ. गोविंद : आदिवासी समस्या व बदलते संदर्भ सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे प्र. आ. जुलै 2000

9)तुमराम, डॉ. विनायकः आदिवासी साहित्य स्वरूप व समीक्षा

10)Upadhyay H.C. :S.C. & S.T. in India, Asocio – Economic Prifile Amol Publication, New Delhi

11)खडसे, डॉ. भा.कि. :जाती वर्ग आणि भारतीय आदिवासी

प्रकाशक– य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक प्र.आ. जून 2002